

# रहस्यमय डब्बे


## एकत्र करून डिझाइन बनवा




**पायरी 1:**
येथे दोन कार्डबोर्ड चे समान डब्बे आहेत ज्यांना रहस्यमय बॉक्स १ आणि रहस्यमय बॉक्स २ असे नाव देण्यात आले आहे. दोन्ही डब्बे वेगवेगळ्या रंगाचे आहेत.





**पायरी २:**
दोन्ही रहस्यमय डब्ब्यांमध्ये चिठ्या आहेत. रहस्यमय बॉक्स १ मध्ये वेगवेगळ्या व्यवसायांच्या चिठ्या आहेत (रंग १) आणि रहस्यमय बॉक्स २ मध्ये वस्तूंच्या चिठ्या आहेत (रंग २).




**पायरी ३:**

तीन किंवा त्याहून अधिक विद्यार्थ्यांनी गटामध्ये येऊन दोन्ही डब्ब्यांमधून एकएक चिठ्ठी काढावी.

**टीप:** चिठ्ठ्या परत ज्या–त्या डब्यांमध्ये टाका.




**पायरी ४:**

आता दोन्ही चिठ्यांमधील नावे एकत्र करा आणि व्यवसायासाठी (रहस्यमय बॉक्स १) काही नाविन्यपूर्ण आणि उपयुक्त वस्तू (रहस्यमय बॉक्स २) डिझाइन करा. जसे की: इलेक्ट्रिशियन साठी उपयुक्त टोपी.


# रहस्यमय डब्बे

## एकत्र करून डिझाइन बनवा

**पार्श्वभूमी**

रहस्यमय डब्यांची ही क्रिया लॅटरल थिंकिंग म्हणजेच सृजनशील दृष्टिकोन वापरुन युक्तिवादाद्वारे समस्या सोडवणे या तत्वावर आधारित आहे. हे सृजनशील विचाराचे तंत्र एडवर्ड डी बोनो यांच्यामुळे लोकप्रिय झाले. एखाद्या समस्येकडे निराळ्या दृष्टिकोनाने पाहताना दोन असंबंधित संकल्पना एकत्र आणल्यास सर्जनशील व भिन्न कल्पना सुचतात (DeBono 1990). डिझाइनचा विचार करण्याच्या प्रक्रियेचा अविभाज्य घटक म्हणजे अर्थपूर्ण आणि सोडवण्यायोग्य समस्या परिभाषित करणे.

रहस्यमय डब्बे, या उपक्रमातील पहिल्या भागात दोन शब्द एकत्र करून थोडक्यात डिझाइन प्रश्न / समस्या तयार करण्यावर लक्षकेंद्रित केले गेले आहे. यामुळे डिझाइन समस्येचे सखोल आकलन होण्यास मदत होते. तर दुसरा भाग हा समस्या सोडवण्यासाठी सृजनशील वस्तुचे डिझाइन तयार करण्यासंबंधी आहे.




वरील रेखाचित्र हे राष्ट्रीय विज्ञानदिन 2019 दरम्यान विद्यार्थ्यांनी डिजाइन केलेले आहे

**References:**

de Bono, E. (1990). *Lateral thinking: Creativity step By step*. New York: Harper Perennial